प्रेस नोट ता. ०५/०५/२०२३

# अल्पवयीन मुलाकडून चोरीच्या मोटर सायकल हस्तगत

## वाहनचोरीचे गुन्हे उघड

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाहनचोरीचे गुन्हे सातत्याने घडत असल्याने मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे व सहा.पोलीस आयुक्त श्री पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणणेसाठी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करुन वाहनचोरी गुन्हयाचा समांतर तपास सुरु असतांना सहा.पोलीस फौजदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, एक अल्पवयीन मुलगा मोटर सायकली चोरुन चोरीची वाहने भाटनगर पिंपरी परिसरात फिरवत असतो अशी खात्रीशीर बातमी मिळालेने गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी युनिट २ पथकाकरवी भाटनगर परिसरात सापळा लावुन ॲक्टीवा मोटर सायकल घेवून फिरणा-या एका अल्पवयीन मुलास पाठलाग करुन शिताफीने ताब्यात घेतले. त्याचेकडे मिळालेल्या वाहनाबाबत सखोल चौकशी केली असता त्याने गेले तीन दिवसापुर्वी गेलार्ड चौक पिंपरी व अशोक थेटर जवळ पिंपरीगाव या परिसरातुन मोटर सायकली चोरल्याची कबुली दिली. सदरच्या मोटर सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

जप्त करण्यात आलेल्या वाहनांबाबत पिंपरी पोलीस ठाणेत खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत-

१) पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५००/२०२३ भादवि कलम ३७९

२) पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४९९/२०२३ भादवि कलम ३७९

वरील प्रमाणे चोरीला गेलेल्या मोटर सायकल जप्त वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. नागरिकांनी त्यांची वाहने नेहमी हँडल लॉक करुन सुरक्षित ठिकाणी लावावी व संशयित इसमांबाबत तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला माहीती कळवावी असे आवाहन पोलीसांचेवतीने करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने ,गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार शिवानंद स्वामी, केराप्पा माने, दिलीप चौधरी, उषा दळे, जयवंत राऊत, आतिष कुडके, शिवाजी मुंढे, अजित सानप, उध्दव खेडकर, यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड

2023.05.05 18:27